श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड यांना पदावरुन तात्पुरते दुर करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/४४० /२०२५
अहिल्यानगर दिनांक २८/०४/२०२५

वाचा:-१. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा(शिस्त व अपील)नियम १९६४ मधील नियम ३
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/ आस्था-१/२७५/२०२५ दिनांक ०३/०४/२०२५

ज्या अर्थी श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड येथे कार्यरत असताना अनाधिकृत गैरहजर रहाणे, कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा करणे, वरिष्ठांच्या आदेशाचे अवमान करणे अशाप्रकारचे गैरवर्तन केलेले आहे. सदर बाब ही कार्यालयीन शिस्तीचे उल्लघंन करणारी आहे. श्री. मुंढ हे जिल्हा परिषद कर्मचारी असुन त्यांनी सदैव निरपवाद, सचोटीने व कर्तव्य परायण असणे आवश्यक आहे. तथापि कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग झालेला आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ३ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे उक्त श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड, यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतुन निलंबीत करीत आहे.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश आमलात राहील तेवढया कालावधीत श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड, यांचे मुख्यालय ……पंचायत समिती पारनेर…… येथे राहिल.

आणि श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड, यांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर…… यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड, यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड, यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल तसेच ते निंलबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

निलंबनाचे कालावधीत निंलबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड यांनी सादर करावे.

निलंबानाचे कालावधीत श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गट विकास अधिकारी, पं. स. पारनेर हे करतील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202504290400059 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 28-04-2025 17:19:32

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

श्री. मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड
द्वारा व प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत:- गट विकास अधिकारी, पं. स. पारनेर.
प्रत:- निवड नस्ती